महाराष्ट्र शासन
जमाबंदी आयुक्त आणि संचालक, भूमि अभिलेख (म.राज्य) पुणे
नवीन प्रशासकीय इमारत दुसरा मजला, विधान भवन समोर, पुणे-४११००१.
दूरध्वनी क्र. ०२०-२६०५०००६ Email ID: est१scoffice@gmail.com

क्रमांक: आस्था १/नियतकालिक बदली २०२४/E-३७८०८४/२०२४ पुणे, दिनांक :- २७/०७/२०२४

प्रति,

उपसंचालक भूमि अभिलेख
पुणे / मुंबई / नाशिक / अमरावती /
छत्रपती संभाजीनगर / नागपूर

विषय :- नियतकालीक बदली सन २०२४-२५
गट-अ, व गट-ब संवर्ग

संदर्भ :- १) शासन निर्णय सामान्य प्रशासन क्रमांक एसआरव्ही-२०१७/ प्र. क्र. ४१५/
कार्यासन १२ दिनांक ०९/०४/२०१८
२) शासन पत्र क्र. बदली-०३२४/प्र.क्र. ८१/ई-६ दिनांक २६/०७/२०२४

उपरोक्त विषयांकीत संदर्भानुसार कळविणेत येते की, सन २०२४-२५ मधील नियतकालीक बदलीकामी दिनांक ३०/०९/२०२१ पूर्वी ज्या अधिका-यांचे बदली आदेश निर्गमित झालेले आहेत. अशा महसूल विभागाच्या अधिनस्त क्षेत्रीय स्तरावरील अधिकारी / कर्मचा-यांचा समावेश सन २०२४-२०२५ या आर्थिक वर्षात सर्वसाधारण बदल्या करताना विचारात घेण्यास मान्यता दिली आहे. तसेच बदल्यांचे अधिनियम २००५ मधील तरतुदीनुसार सक्षम प्राधिका-यांचे अधिकार विशेष बाब म्हणुन मा.मंत्री (महसुल) यांना दिनांक ३१/०७/२०२४ पर्यंत सोपविले आहेत.

त्यानुसार कार्यवाही करणेकामी उक्त शासन निर्णयामध्ये तरतुद केलेप्रमाणे रिक्त पदांची यादी व बदली पात्र अधिकाऱ्यांची यादी प्रसिध्द करणेत येत आहे. सदर यादी इकडील सेवा अभिलेख व आपलेकडील प्राप्त माहितीचे आधारे तयार करणेत आलेली आहे. **यामध्ये एखादे रिक्त पद अथवा अधिकारी यांचे नांव समाविष्ठ करणेचे राहून गेले असल्यास त्याबाबतची खात्री/पडताळणी करून दिनांक २९/०७/२०२४ रोजी सकाळी ११.०० वाजेपर्यंत आपला अहवाल या कार्यालयास सादर करावा.**

तसेच बदलीपात्र अधिकाऱ्यांनी विवरणपत्र - १ नुसार केलेल्या नमुन्यात पसंतीक्रमाची माहिती दिनांक २९/०७/२०२४ रोजी सकाळी ११.०० वाजेपर्यंत परस्पर या कार्यालयाकडे asthapana1scoffice@gmail.com या ई-मेलवर सादर करणेबाबत समज द्यावी. तसेच ज्या अधिकाऱ्यांनी यापूर्वी बदलीबाबतचे विनंती अर्ज परस्पर किंवा संबंधित नियंत्रण अधिकारी यांचे मार्फत सादर केले असतील तर ते विचारात घेतले जाणार नाहीत याची नोंद घ्यावी.

जे अधिकारी विशेष कारणास्तव प्राधान्यक्रम नमूद करतील त्यांनी त्याबाबत सक्षम प्राधिकाऱ्याने दिलेले प्रमाणपत्र व अन्य कागदपत्रांचे पुरावे सोबत जोडणे आवश्यक राहील अन्यथा त्यांचे प्राधान्यक्रम विचारात घेतले जाणार नाही.

तसेच ज्या अधिकारी यांची **विभागात १० वर्षापेक्षा अधिक सेवा झालेली आहे त्यांनी सध्याचा कार्यरत विभाग सोडून इतर विभागातील** रिक्त पदांनुसार किमान **पाच** विकल्प देणे बंधनकारक राहील.

बदलीपात्र जे अधिकारी दिनांक २९/०७/२०२४ पर्यंत त्यांचे पसंतीक्रम सादर करणार नाहीत अशा अधिकाऱ्यांना प्रशासकीय कारणास्तव रिक्त पदे भरण्याच्या निकडीनुसार पदस्थापना दिली जाईल. तसेच असे अधिकारी पदस्थापनेचा कालावधी पूर्ण होईपर्यंत मुदतपूर्व बदलीसाठी अर्ज करू शकणार नाहीत. तसेच अशा अधिकाऱ्यांनी विनंती अर्ज सादर केल्यास ते विचारात घेतले जाणार नाहीत.

महाराष्ट्र नागरी सेवा (वर्तणुक) नियम १९७९ नियम २३ नुसार बदलीबाबत वरीष्ठ प्राधिकाऱ्यावर कोणताही राजकीय दबाव अथवा बाह्य दबाव आणल्यास महाराष्ट्र नागरी सेवा (शिस्त व अपील) नियम १९७९ मधील तरतुदीनुसार कारवाई करणेत येईल. त्याबाबत सर्व संबंधितांना आपलेमार्फत समज देण्यात यावी.

संबंधित उपसंचालक भूमि अभिलेख यांनी बदलीपात्र अधिकारी यांना सोबत संलग्न केलेली बदलीपात्र अधिकारी यांची यादी व रिक्त पदांची यादी बजावून तात्काळ अहवाल सादर करावा. सदर बदलीपात्र अधिकाऱ्यांनी त्यांचे विकल्प asthapana1scoffice@gmail.com या ई-मेलवर वर दिनांक २९/०७/२०२४ रोजी सकाळी ११.०० वाजेपर्यंत सादर करावेत याबाबत समज देण्यात यावी. तसेच सदरचे बदलीपात्र अधिका-यांची यादी विभागाच्या mahabhumi.gov.in या वेब साईटवर प्रसिध्द करणेत आलेली आहे.

सोबत :- १) गट-अ व गट-ब संवर्गातील बदली पात्र अधिकारी यादी असत.

२) गट-अ व गट ब संवर्गातील रिक्त पदांची यादी असत.

३) विकल्प नमुना

मा. जमाबंदी आयुक्त (म.राज्य)
पुणे यांच्या मान्यतेने

( आनंद भंडारी ) भा.प्र.से.
अप्पर जमाबंदी आयुक्त आणि
अतिरिक्त संचालक भूमि अभिलेख पुणे